श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

फेब्रुवारी २०२३ | वर्ष - ११, अंक - २ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने २०

## डेरवण येथे जॅग्वार लढाऊ विमान 'वॉर ट्रॉफी'चे अनावरण आणि 'स्पेस-लॅब'चे उद्घाटन




दि. २४ जानेवारी २०२३ रोजी डेरवणच्या श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या इंग्लिश मिडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये दोन महत्त्वाचे समारंभ माजी हवाईदल प्रमुख एअर चिफ मार्शल मा. प्रदीप नाईक, PVSM, VSM, ADC यांच्या अध्यक्षतेखाली साजरे करण्यात आले. पहिला समारंभ होता जॅग्वार लढाऊ विमान - 'वॉर ट्रॉफी'चे अनावरण आणि दुसरे 'स्पेस-लॅब'चे उद्घाटन. विद्यार्थ्यांमध्ये लष्करीपेशाबद्दल आकर्षण निर्माण व्हावे तसेच अंतराळ विज्ञानाविषयी कुतूहल निर्माण व्हावे यासाठी ट्रस्टने अत्यंत योजकतेने कोकणात असे युद्ध-स्मारक आणि असे अंतराळसंशोधनाविषयी सांगोपांग माहिती देणारे प्रदर्शन आपल्याच विद्यार्थ्यांसाठी नव्हे तर कोकणातील सर्वांसाठी, किंबहुना महाराष्ट्रभरातील क्रीडासंकुलात खेळायला येणाऱ्या क्रीडापटूंना आणि शिवसृष्टी पाहायला येणाऱ्या पर्यटकांना खुले करून आपल्या समाजोपयोगी विविध उपक्रमात मोलाची भर घातली आहे.

या कार्यक्रमासाठी मा. नाईकसाहेबांसोबतच सौ. नाईक, विंग कमांडर (निवृत्त) श्री. रवींद्र महाजन, लोहगावच्या हवाईदलाच्या तळाचे मुख्य अभियांत्रिकी अधिकारी ग्रूप कॅप्टन श्री. संदीपकुमार धिमण, ट्रस्टचे विश्वस्त श्री. अशोकराव जोशी आणि श्री. विकासराव वालावलकर, तसेच आरोग्य संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, शिक्षण संचालिका सौ. शरयू यशवंतराव, क्रीडा संचालक श्री. श्रीकांत पराडकर, अस्थिशल्य चिकित्सक डॉ. सुनील नाडकर्णी, ट्रस्टचे कर्मचारी, विविध शाखांचे विद्यार्थी आणि ग्रामस्थ पालक उपस्थित होते.

सर्वप्रथम क्रीडासंकुलात ठेवण्यात आलेल्या जॅग्वार लढाऊ विमानाचे अनावरण मा. नाईकसाहेबांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांना ते म्हणाले की हे भारतीय हवाई दलाचे एक महत्त्वाचे, शत्रूच्या प्रदेशात खोलवर चढाई करून बॉम्बफेक करण्याची क्षमता असलेले विमान येथे स्थापन झालेले आहे याचा आम्हाला फार आनंद होत आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना विमानाला लावलेली शिडी चढून जाऊन विमानाचे बारकाईने निरीक्षण करण्याचे आवाहनही केले तसेच मोठे होऊन तुम्हीही लढाऊ वैमानिक व्हाल असे विचार व्यक्त केले. या विमानाची डेरवण येथे पुनर्जोडणी करणाऱ्या हवाईदल कर्मचाऱ्यांसोबत आवर्जून छायाचित्र काढून घेऊन मा. नाईकसाहेबांनी पाहुण्यांसमवेत संकुलातील शूटिंग रेंजला




*डावीकडून – डॉ. नाडकर्णी, विंग कमांडर यादव, सौ. नाईक, विंग कमांडर (नि.) रवींद्र महाजन, एअर चिफ मार्शल (नि.) मा. प्रदीप नाईक, श्री. अशोकराव जोशी, ग्रूप कॅप्टन श्री. संदीपकुमार धिमण, श्री. विकासराव वालावलकर, विंग कमांडर जी. हरिप्रसाद, सौ. शरयू यशवंतराव आणि डॉ. सुवर्णा पाटील*

भेट देऊन पाहणी केली आणि तेथून सर्व जण इंग्लिश मिडियम शाळेच्या नव्या इमारतीत उभारण्यात आलेल्या 'स्पेसलॅब'च्या उद्‌घाटनासाठी आले.

डेरवणच्या इंग्लिश मिडियम शाळेच्या नव्या इमारतीत तीन मोठ्या दालनात उभारलेल्या या कायमस्वरूपी प्रदर्शनाचे उद्‌घाटन मा. नाईकसाहेब यांच्या हस्ते करण्यात आल्यावर त्यांनी सर्व निमंत्रित सन्माननीय पाहुण्यांसमवेत प्रदर्शनाची पाहणी केली. त्या वेळी या लॅबची उभारणी करणारे मा. सुयश डाके यांनी या प्रदर्शनाची वैशिष्ट्ये सर्वांना विशद करून सांगितली.

ही स्पेसलॅब साधारण १८०० स्के.फू. एवढ्या भागावर उभारली आहे. त्याचे साधारणपणे दोन भाग करता येतील. एक भाग हा आहे ॲस्ट्रॉनॉमी म्हणजे आकाश समजून घेण्यासाठी प्रतिकृती, ज्या इंटर–ॲक्टिव म्हणजे ज्यामध्ये काही कृतीतून मुलांना विषय समजू शकेल अशा तऱ्हेने तयार केलेला आहे. आकाशाच्या मूलभूत संकल्पना समजण्यासाठी या भागाचा उपयोग होईल. आणि दुसरा भाग आहे तो अंतराळविषयक सध्या जे संशोधन सुरू आहे त्यासंबंधी आहे. उदा. अंतराळात पाठविण्यात येणाऱ्या मोठ्या दुर्बिणी कशा असतात, नुकतीच जेम्स वेब स्पेस टेलिस्कोप (JWST) अंतराळात सोडली आहे. त्या आधी 'हबल' ही दुर्बीण सोडलेली होती. रेडिओ टेलिस्कोप्स, सॅटेलाईट्स, स्पेस शटल्स, स्पेस कॅप्सुल्स यांच्याविषयीच्या मूलभूत संकल्पना मुलांना समजाव्यात अशा तऱ्हेने हा भाग मांडला आहे. येथे अंतराळवीराचा एक पुतळा असा केला आहे की त्याच्यामागे उभे राहून पुतळ्याच्या चेहऱ्याच्या मोकळ्या ठेवलेल्या भागात आपला चेहरा आणून मुलांना आपला अंतराळवीरासारखा फोटो काढता येईल. अंतराळवीर वापरतात तो सूटही एका पुतळ्याला घालून ठेवला आहे. त्यामुळे अंतराळवीर कसा दिसतो हे मुलांना प्रत्यक्षपणे पाहता येईल. रशियाने सोयुझ अंतराळयानासाठी तयार केलेला एक सूटही तसाच पुतळ्याला घालून प्रदर्शनार्थ ठेवलेला आहे. १२ फूट उंचीच्या अंतराळकुपीची (स्पेस कॅप्सुलची) प्रतिकृतीही येथे ठेवण्यात आलेली आहे. आणि त्यात एक पुरुष आणि एक स्त्री अंतराळवीर बसलेले दाखवून स्त्रियांचा अंतराळसंशोधनातील सहभागही अधोरेखित करण्यात आलेला आहे.

आपला अंतराळसंशोधन विषयक इतिहासही महत्त्वाचा आहे. चौथ्या–पाचव्या शतकातील आर्यभट्ट, त्याही आधीचे इसवीसनपूर्व काळातील वेदांग ज्योतिष हे आपले प्रगत विज्ञान दाखविणारे विषय येथे मांडलेले आहेत. कोपर्निकस, गॅलिलिओ, न्युटन, आइन्स्टाईन अशा पाश्चात्य खगोलशास्त्रज्ञांची कामगिरीही येथे मांडण्यात आली आहे. वेगवेगळ्या ग्रहांवर आणि सूर्यावरही आपले वजन किती भरेल हे दाखविणारे एक उपकरण मांडलेले आहे. त्यामुळे 'वजन' ही संकल्पना मुलांना मनोरंजक पद्धतीने कळेल. बहुतेक ठिकाणी सूर्यमालेचे मॉडेल दाखवताना सर्व ग्रह एकाच गतीने फिरताना दाखविले जातात, कारण ते त्या उपकरणातील एकाच मोटरने फिरवले जातात.



*मा. नाईकसाहेब यांच्या हस्ते स्पेसलॅबचे उद्‌घाटन*




*पाहुण्यांना स्पेसलॅबमधील विविध मॉडेल्सविषयी माहिती देताना श्री. सुयश डाके*

येथे जे मॉडेल केले आहे तेथे सगळ्या ग्रहांचे सूर्याभोवतीचे फिरणे त्यांच्या प्रत्यक्षात असलेल्या परस्पर गतीच्या प्रमाणात प्रमाणबद्धपणे दाखविलेले आहे. भारतात हे बहुधा पहिलेच असे प्रमाणबद्ध मॉडेल असावे. चंद्र, सूर्य आणि पृथ्वी यांचे मॉडेल हेही असेच प्रमाणबद्ध असून त्यामुळे ग्रहणे कशी होतात, दर पौर्णिमा, अमावास्येला ती का होत नाहीत हे सुलभपणे कळेल. पृथ्वीवरील अक्षांश रेखांशांप्रमाणे आकाशात वैश्विक वृत्त असतात. ती वृत्ते दाखविणारे मॉडेल येथे आहे. जवळचे तारे, बारा राशीतून सूर्याचे भ्रमण, ताऱ्यांचे अंतर मोजण्यासाठी वापरण्यात येणारी पॅरॅलॅक्स मेथड, टेलिस्कोपचा 'रे-डायग्रॅम' दाखविणारे मॉडेल, सॅटेलाइट्स, मंगळावर उतरलेली बग्गी, वजनरहित अवस्थेत तरंगणारा अंतराळवीर अशी वेगवेगळी मॉडेल्स येथे मांडलेली आहेत. अतिशय कलात्मकतेने उभारलेली ही स्पेस-लॅब मुलांच्याच नव्हे तर मोठ्यांच्याही आकर्षणाचा विषय होणार आहे यात शंका नाही.

यानंतर ट्रस्टच्या बहुउद्देशीय सभागृहात आयोजित समारंभात पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले आणि शालेय विद्यार्थ्यांनी गाइलेल्या गणेशवंदनेनंतर ट्रस्टचे प्रमुख विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे मा. नाईकसाहेब, तसेच सन्माननीय पाहुणे विंग कमांडर (निवृत्त) श्री. रवींद्र महाजन, ग्रूप कॅप्टन श्री. संदीपकुमार धिमण, यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर या विमानाची डेरवण येथे जोडणी करणाऱ्या हवाईदलाच्या विंग कमांडर राहुल यादव आणि जी. हरिप्रसाद, ज्युनिअर वॉरंट ऑफिसर राहुलकुमार, सार्जंट एस. के. परमार आणि आर. के. मिश्रा, कॉर्पोरल शेख, लिंगप्पा, राहुलसिंग आणि चालक अजीजसिंग यांचाही सत्कार करण्यात आला.

आपल्या प्रास्ताविक भाषणात शिक्षण संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी या समारंभामागील ट्रस्टची भूमिका विशद करून



*अंतराळकुपीच्या प्रतिकृतीसमवेत मा. नाईकसाहेब,*
*श्री. अशोकराव जोशी आणि श्री. सुयश डाके*




*विविध मॉडेल्स पाहताना सौ. नाईक आणि*
*मा. नाईकसाहेब, उजवीकडे श्री. सुयश डाके*




*डावीकडून – सौ. शरयू यशवंतराव, श्री. रवींद्र महाजन, श्री. प्रदीप नाईक, श्री. विकासराव वालावलकर, श्री. संदीपकुमार धिमण, डॉ. सुवर्णा पाटील*

सांगितली. त्या म्हणाल्या की मातृभूमीचे रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या त्यागाविषयी देशभक्त नागरिकांच्या मनात जागृती निर्माण करण्यासाठी ट्रस्ट नेहमीच प्रयत्नशील असतो. आम्ही मुलांनाही सेनादलात सामील होण्यासाठी उद्युक्त करण्याच्या दृष्टीने नेहमी प्रयत्नशील असतो. त्यासाठी सेनाधिकारी आणि 'डीआरडीओ'सारख्या संस्थांतील संशोधकांसोबत त्यांचा संवाद घडवून आणि अशा 'वॉर-ट्रॉफी'ज त्यांच्यासमोर ठेवून आपल्या सैन्यदलाच्या महान प्रथा-परंपरांचा परिचय करवून त्यांना आम्ही सेनादलात जाण्यासाठी प्रोत्साहित करीत असतो.

आपल्या हवाई दलाने भेट दिलेल्या या जॅग्वार विमानाचा तांत्रिक तपशील देऊन त्यांनी या विमानाने १९९९ साली कारगिल युद्धात केलेल्या महत्त्वाच्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. २०१७ साली आपल्या सैन्यदलाकडून भेट मिळालेला 'अनुराग' रणगाडा आणि हे जॅग्वार विमान हे केवळ विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी नव्हे तर आपले सैन्यदलाशी असलेले संघटन, देशरक्षणाविषयी असलेली आपली जबाबदारी आणि आपल्या शूर सैनिकांप्रती आपण जे देणे लागतो त्याची जाणीव व्हावी यासाठीच येथे स्थापन केलेले आहेत. भूतकाळात आपल्या सैनिकांनी केलेल्या त्यागाची ही स्मारके सदैव आठवण करून देतील आणि देशरक्षणासाठी सैन्यात जाण्याची प्रेरणा देत राहतील.

स्पेस-लॅब हा ट्रस्टच्या मुकुटातील आणखी एक मानाचा तुरा असून भारत हा आता अंतराळ संशोधनात एक महासत्ता म्हणून उदयाला येत आहे असे सांगून हे "Interactive Space and Astronomy Activity Centre" ग्रामीण भागातील मुलांमध्ये आकाश आणि अवकाश अन्वेक्षणाच्या क्षेत्रातील मूलभूत कल्पनांविषयी औत्सुक्य निर्माण करण्यासाठी आणि ज्ञान देण्यासाठी ट्रस्टने उभारले आहे असे सांगितले.

जेव्हा तुम्हाला एखादी गोष्ट मिळावी असे अगदी उत्कटतेने वाटते तेव्हा सगळे जगच तुमच्या मदतीला धावते. श्रीकाकामहाराजांना वाटले की आपल्या शाळेत अंतराळशास्त्राचे ज्ञान मिळावे. आसावरी ठाकूरमॅडम यांनी श्री. सुयश डाके आणि त्यांची 'टिम कुतूहल' यांची ओळख करून दिली आणि ते स्वप्न सत्यात आले.

श्री. आशुतोष पंडित आणि सौ. अश्विनी जोशी-पंडित, आय.ए.एस., यांनी नेहमीप्रमाणेच उत्साहाने पुढे होऊन शास्त्रीय उपकरणे भेट दिली. आम्हाला एक अस्सल स्पेससूट मुलांना पाहता यावा म्हणून हवा होता. त्याही बाबतीत मा. नाईकसाहेबांनी 'इस्रो'शी संपर्क करून आम्हाला तो मिळवून दिला.जॅग्वार विमानही येथे स्थापन होण्यामागे त्यांचेच खूप परिश्रम आहेत. आम्ही 'इस्रो'चेही, त्यांनी दिलेल्या स्पेस सूट, वेगवेगळी मॉडेल्स आणि चार्ट्स आदीसाठी उपकृत आहोत.

आम्हाला 'नासा'कडून 'ओरिजनल' स्पेस सूट पाहिजे होता. तोही आम्हाला आसावरी ठाकूरमॅडम यांची खास मैत्रीण श्रीमती आरती पाटील, प्राचार्या, साधू वासवानी इंटरनॅशनल स्कूल, आणि स्पेस फाउंडेशन, 'नासा'च्या संपर्काधिकारी यांच्या प्रयत्नाने मिळाला. अशी 'खास' माणसे मिळत गेली आणि आमचे स्वप्न सत्यात उतरले.

आमच्या मुलांची योग्यता, सकारात्मकता, कौशल्य आणि ज्ञान वाढावे आणि त्याद्वारे त्यांना त्यांच्या क्षमतेची जाणीव व्हावी आणि




*श्री. प्रदीप नाईक यांचा श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते सत्कार*




*श्री. महाजन यांचा श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते सत्कार*

त्यांनी समाजासाठी, देशासाठी आणि जगासाठी काहीतरी भरीव करावे यासाठी ही शाळा नेहमी प्रयत्नशील असते.'

यानंतर श्री. धिमणसाहेब यांनी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, '....हे फायटर जातीचे अत्यंत वेगवान लढाऊ जॅग्वार विमान एका वॉर-ट्रॉफीच्या रूपात प्रदर्शित करण्याच्या आणि भावी पिढीच्या तेजस्वी तन-मनाला प्रज्वलित करण्याच्या या महान प्रयत्नाचा भाग होण्याची संधी दिल्याबद्दल मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. जेव्हा मी नवोदय विद्यालयात तुमच्यासारखा विद्यार्थी होतो, तेव्हा जग खूप साधे होते. आजूबाजूला काय चालले आहे, हे जाणून घेण्यासाठी आम्ही वर्तमानपत्रे आणि मासिके बघायचो. विज्ञान अजूनही पुस्तकापुरते मर्यादित होते. पण तो काळ आता निघून गेला आहे. आणि जेव्हा मी भारताचे आणि जगाचे भविष्य पाहतो, जे तुम्ही लोक आहात, तेव्हा हे जाणून मला खूप आनंद होतो की खरोखरच आपण एका रोमांचक काळामध्ये आहोत, जिथे तुम्हा प्रत्येकाकडे ज्ञानाचा स्रोत आहे. त्यामध्ये केवळ भारताचेच नाही तर या जगाचे भविष्य बनवण्याची शक्ती आहे. हे सत्य प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे एक दशकापासून विकसित झालेल्या तंत्रज्ञानाचे परिणाम आहे. आपण पाहत असलेले हे जॅग्वार विमान पन्नास वर्षे जुने तंत्रज्ञान आहे जे अजूनही उड्डाण करण्यास सक्षम आहे. विमान चालवण्याचे तंत्रज्ञान अर्थात एव्हिएशन टेक्नॉलॉजीच्या महान प्रतिभांच्या प्रक्रियेतून विकसित झाले आहे ज्याने आज अत्याधुनिक विमानांना जन्म दिला आहे. आपल्या सभोवती जे नवीन तंत्रज्ञान आपल्याला समोर दिसत आहे, मग ते इंटरनेट असू द्या, ई-मेल असू द्या किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स असू द्या; त्याचा सर्वप्रथम आविष्कार आणि वापर हा सैन्यामध्येच झालेला दिसून येईल.

परंतु एक गोष्ट जी तुम्हाला अगदी स्पष्टपणे सांगितली पाहिजे, ती म्हणजे तांत्रिक बदलांचा वेग इतका वाढला आहे की या जॅग्वार विमानाप्रमाणे कोणतेही नवीन तंत्रज्ञान टिकणार नाही. तंत्रज्ञानाचा चेहरामोहरा झपाट्याने बदलत आहे. प्रत्येक दिवशी काहीतरी नवीन केल्याने जुने तंत्रज्ञान कालबाह्य होत आहे आणि यालाच 'व्यत्यय आणणारे तंत्रज्ञान' म्हणजेच disruptive technology असे म्हणतात. आणि म्हणूनच मला असे मुद्दाम सांगावेसे वाटते, की तुमच्यापैकी प्रत्येकामध्ये भारताला एक विकसित महासत्ता बनवण्यासाठी प्रामुख्याने तंत्रज्ञान आणि इतर महत्त्वाच्या राष्ट्रउभारणीच्या पायऱ्यांद्वारे वाटचाल करण्याची मोठी क्षमता आहे. यामध्ये 'एसव्हीजेसीटी' सारख्या मान्यवर शिक्षण संस्था पुढे येतात आणि तुमच्या कल्पनेला पंख देऊन तुमची खरी क्षमता ओळखून तुम्हाला या देशाचे उज्ज्वल भविष्य घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. आज येथे महान लढाऊ विमान बसविण्याच्या महान कार्याचा भाग होण्याचा मला विशेष अभिमान वाटतो. जेणेकरून तुम्हाला पुढच्या पिढीला सैन्याच्या रोमांचक आणि विशेष साहसपूर्ण जीवनाचा जवळून परिचय मिळू शकेल. कारण तुमच्यापैकी काही जण पुढच्या वर्षात पायलट, डिझाईनर, अभियंते, डॉक्टर आणि बरेच काही बनतील. भारताचे आणि जगाचे भावी नागरिक या नात्याने मी तुम्हाला सल्ला देतो की, तुम्ही भूतकाळावर लक्ष ठेवा आणि पुढील भविष्याला आलिंगन द्या. ज्ञानार्जनाच्या प्रक्रियेद्वारे स्वतःला जागरूक करण्यासाठी पूर्ण प्रयत्न करा. तुमची खरी क्षमता ओळखण्यासाठी तंत्रज्ञानाचा, विशेषतः इंटरनेटचा शक्य तितका वापर करा. आणि दररोज एक चांगले नागरिक बनण्याच्या दिशेने कार्य करा. तुमच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा! धन्यवाद. जय हिंद.'

यानंतर मा. रवींद्र महाजन यांनी आपले विचार व्यक्त केले.ते म्हणाले, 'आता धिमणसाहेबांनी मराठीत भाषण केल्यानंतर मला आता कोणताच पर्याय राहिला नाहीये. जरी मी इतकी दशकं मराठी बोलत असलो तरीसुद्धा त्यांच्याइतकं मी मराठी बोलू शकणार नाही आणि त्यांच्यामधली ही मराठी बोलण्याची तळमळ खरोखरच सर्वांना भावणारी आहे. माझा मंदिराबरोबरचा, मठाबरोबरचा संबंध खूपखूप पूर्वी आला. १९५५ सालापासून मी मठात जात आहे. आणि मला




*श्री. धिमण यांचा श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते सत्कार*




*सौ. शरयू यशवंतराव प्रास्ताविक भाषण करताना*

त्याचा खूप मोठा आनंद वाटतो की, मी तिथे जात असल्यामुळे माझ्यात खूप बदल झाले आहेत. असेच ते तुमच्यामध्येही झाले असतील आणि मला स्वतःला त्याच्याबद्दल खूपखूप अभिमान वाटतो. एक गोष्ट तुम्हाला जी माहीत आहे तरी सांगू इच्छितो की, आपल्या इथे जे जे येतात ते आपले होऊन जातात. त्यांच्याकरिता कुणाला वेगळं काही करावं लागत नाही. एका पहिल्या दर्शनानंतरच लोकांना या संपूर्ण वास्तूबद्दल प्रेम, आत्मीयता, आदरभाव येतो. याचे पहिले कारण म्हणजे काकासाहेब, ज्यांच्याबद्दल न बोललं किंवा बोललं तरीसुद्धा ते अपुरंच आहे. आणि त्यांच्याबरोबरीने विकास वालावलकरसाहेबांनी जो सपोर्ट व जे डेडिकेशन दिले आहे, ते तुम्ही सर्वांनी सतत पाहिले आहे. या गेल्या ४० ते ५० वर्षांमध्ये एका छोट्याशा वास्तूमधून त्याची आता जी भव्यता आलेली आहे ती पाहून मला असं वाटतं की, मी दहा वेळा ताजमहाल पाहिला तरी त्याच्याबद्दल एवढं कौतुक वाटणार नाही, जेवढं ही वास्तू पाहून मी आश्चर्यचकित होऊन जातो. कारण की मागच्या वेळेस मी जे पाहिलं होतं ते हेच आहे का आणि असेच अनुभव बऱ्याच जणांनी घेतलेले असतील. या जॅग्वार विमानाच्या आधी आपल्या संस्थेकरिता मला एक-दोन वेळा आणखीन मदत करायची किंवा त्याला हातभार लावायची संधी मिळाली होती. आता या जॅग्वार विमानाच्या बाबतीतसुद्धा मी तुम्हाला सांगू इच्छितो की, हे एका माणसाचे काम नाही तर, एका माणसाची इच्छा व त्याला इतर माणसांचा हातभार असे हे टीम वर्क झालं आहे आणि हे इतकं सुरेख टीमवर्क होतं की, आज त्याचा जो परिपाक आहे तो पाहिल्यानंतर प्रत्येकाला आपली छाती आणखीन दोन इंच पुढे आल्याचे जाणवत असेल.

आपला स्वाभिमान वाढविण्याकरिता ह्या विमानाने खूप काही केलेले आहे. आणि मी सगळ्या विद्यार्थ्यांना हेच सांगणार आहे की, आता हे विमान पाहिल्यानंतर इंडियन एअर फोर्समधल्या प्रत्येक विमानाबद्दल माहिती घ्या. प्रत्येक वीराबद्दल माहिती घ्या. परमवीर चक्र, महावीर चक्र, वीर चक्र ज्यांना मिळाले आहे, त्यांनी काय धैर्य दाखवले आहे आणि देशाकरिता कायकाय केलेलं आहे हे तुम्ही जाणून घ्या. आणि नुसतं जाणून न घेता तुमच्या हृदयामध्ये रक्ताचा प्रत्येक थेंब आहे तो त्या दृष्टीने तयार केला पाहिजे. तुम्ही आज या भारताचे नवीन तरुण जे मला दिसतंय ते आता मोठे झाल्यानंतर आम्हाला तुमचा अभिमानच वाटेल असं मला वाटतं. या वास्तूने आत्ता तुम्हाला काय दिलं आहे याची कल्पना कदाचित आज तुम्हाला येणार नाही; पण आम्हाला स्वतःला कल्पना आहे की आम्ही कुठल्या परिस्थितीमध्ये शिकलेले आहोत, आणि तिथून पुढे आजचे तुमचे हे जे भाग्य आहे ते खूपखूप मोठे आहे, याची जाणीव होईल आणि तुम्ही त्याप्रमाणे अभ्यास कराल व देशाला मोठं करण्यासाठी जे काय तुम्हाला जमेल ते सतत करत राहाल एवढीच माझी इच्छा आहे. जय हिंद.

शेवटी मा. नाईकसाहेबांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले, 'माझे मराठी धिमणसाहेबांच्या मराठीपेक्षा कच्चे आहे आणि इंग्रजी फारच खराब आहे. त्यामुळे मी दोन्ही भाषा वापरून माझे भाषण करणार आहे. आज मला खूप आनंद होतोय, कारण आज या प्रांगणात जॅग्वार लढाऊ विमान आणि अनुराग रणगाडा हे एकत्र इतके सुंदर दिसत होते. त्याचं कारण इथल्या विद्यार्थ्यांनी किती सुंदर सजावट केली होती की माझ्यासह सगळ्यांनाच ते दृश्य बघणे, ही एक पर्वणीच होती. विविध क्षेत्रातल्या, विविध पदांवरच्या अनेक लोकांनी आणि त्यातील प्रत्येकानेच घेतलेल्या गेल्या दहा वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर, शेवटी परमपूज्य काकामहाराजांच्या आशीर्वादाने आणि अर्थातच देवाच्या कृपेमुळे हे सारे डेरवणच्या परम पवित्र भूमीमध्ये स्थापित करण्यात आम्हाला यश आले आहे. आता ते दोन्ही इतके सुंदर दिसतात. आजचा हा सोहळा घडवून आणण्यासाठी अथक परिश्रम करणाऱ्या, समर्पित भावनेने राबणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या योगदानाचा जर मी उल्लेख केला नाही, तर मोठा अन्याय मी करतोय, असं मला वाटेल. सर्वप्रथम हे विमान ज्यांच्या ताब्यात आले ते लोहगाव वायुसेना प्रमुख ग्रूप कॅप्टन धिमण आणि




*श्री. धिमण आपले विचार मांडताना*




*श्री. महाजन – 'माझा मंदिराबरोबरचा संबंध खूपखूप पूर्वी आला.'*

त्यांचे सहकारी. हे विमान खूप मोठे होते. त्या विमानाचे कोणते भाग, कोणत्या ठिकाणी, कसे फिट करायचे हे कळत नव्हते. पण धिमणसाहेबांच्या संपूर्ण टीमने हे शिवधनुष्य लीलया पेलले आणि त्याचा मूर्तिमंत परिणाम म्हणजे, या डेरवण प्रांगणात दिमाखात उभे असलेले हे जॅग्वार विमान. यासाठी जामनगर आणि जोधपूर येथून आलेले तंत्रज्ञ, डेरवणमधील सहकारी, इथले व्यवस्थापन आणि संस्था या सर्वांनी जे बहुमोल सहकार्य केले, त्यांच्या परिश्रमांचे आपण एकदा जोरदार टाळ्या वाजवून कौतुक करु या.

एवढ्या सगळ्यांचे कष्ट, परिश्रम हे सगळं उभे करण्यासाठी नेमके का एकत्र आले? हे समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. सर्वात महत्त्वाचं कारण म्हणजे, माझ्या विद्यार्थी मित्रांनो, तुमच्या मनाची कवाडे उघडून तुमच्या संकल्पनांच्या कक्षा रुंदावण्यासाठी, भविष्यातील तुमची क्षितिजे विस्तारण्यासाठी तुम्हाला या शाळेच्या वर्गामधून बाहेर नेऊन, घराच्या आणि डेरवणच्याही बाहेर असलेल्या जगाची ओळख करून देण्यासाठी!

इथे असलेल्या मत्स्याहारी लोकांना मी सांगत असलेल्या या कारणाचा अर्थ चटकन कळेल. ज्याप्रमाणे विहीर, नदी, तलाव आणि समुद्र या ठिकाणी मिळणारे मासे त्यांच्यात्यांच्या क्षमतेनुसार आकाराने मोठेमोठे होत जातात याचं कारण त्यांचा भोवताल आणि त्या भोवतालाचा रुंदावत जाणारा आकार! अगदी तसंच, तुमच्या मनाचा, विचारांचा आणि संकल्पनांचा आवाका वाढत गेला, तर तुमच्या आयुष्याचा आयाम भविष्यामध्ये नक्की वाढलेला दिसेल, असे या शाळेला, संस्थेला आणि आम्हा सर्वांना वाटते.

दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे, तुम्ही आपल्या देशाच्या सशस्त्र सेनादलांचा विचार करावा. आपल्या सर्वांना येथे सुखाची झोप यावी म्हणून तिथे बॉर्डरवर, समुद्रात आणि आकाशात वर्षाचे ३६५ दिवस अहोरात्र डोळ्यांत तेल घालून जागता पहारा देणारे आपल्या देशाचे जवान! आज आपण इकडे जो अभ्यास करतो, खातो, पितो, फिरतो, मौजमजा करतो हे सर्व केवळ या सैनिकांच्या सीमेवरील दक्ष पहाऱ्यामुळे आहे. त्यांच्या बलिदानामुळे आणि त्यागामुळे आहे. त्यांची आठवण आणि त्यांचा त्याग याची माहिती सदैव तुम्हाला तुमच्या मनात जागृत ठेवता यावी, म्हणून मुलांनो, तुमच्या देशाप्रती असलेल्या कर्तव्यांची ही प्रतीके आहेत.

त्यामुळे विद्यार्थ्यांनो, तुम्हांला या जवानांना मदत करायची किंवा त्यांच्या ऋणातून उतराई व्हायची जेव्हाजेव्हा संधी मिळेल तेव्हा तेव्हा तुम्ही इतर कोणताही विचार न करता आनंदाने पुढाकार घेतला पाहिजे. आता प्रश्न येतो की, आपल्यासाठी या जवानांनी दिलेल्या बलिदानासाठी आपण खरोखर पात्र आहोत का आणि ती पात्रता आपल्यामध्ये कशामुळे येईल. काही छोटीछोटी सूत्रे आहेत जी पाळली, तर आपण आपल्या आयुष्यात या देशाचे नागरिक म्हणून या जवानांनी आपल्यावर केलेल्या उपकारांची देशसेवेने परतफेड करू शकतो. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ज्यांना शक्य आहे त्यांनी आपल्या देशाच्या संरक्षण खात्यामध्ये भरती व्हावे. मुलांबरोबर मुलींनाही आजकाल सैन्यदलांमध्ये संधी आहे आणि त्याचा पुरेपूर लाभ या संस्थेची मुलं आणि मुलीसुद्धा घेतील याचा मला विश्वास आहे. हा तुम्ही त्यांच्या ऋणातून उतराई होण्याचा एक मार्ग झाला. जर हे जमलं नाही, तर एक चांगला भारतीय नागरिक होण्याचा प्रयत्न नक्की करा. म्हणजे शिस्त, स्वयंशिस्त स्वतःमध्ये बाणवून घेणे, सार्वजनिक ठिकाणी वावरताना सामाजिक भान ठेवणे, नियमांचे पालन करणे, आपल्या कामाच्या ठिकाणी, आपल्या कामांमध्ये प्रामाणिक राहणे यांसारख्या छोट्याछोट्या गोष्टी आपण देशासाठीचं कर्तव्य म्हणून पाळल्या पाहिजेत.

यानंतरचा टप्पा आहे की आपल्या देशाकडे जात, भेद, धर्म म्हणून बघू नका. संपूर्ण देशाने आजवर केलेल्या आणि भविष्यात येऊ घातलेल्या गौरवपूर्ण वाटचालीचा विचार करा. आपल्या तिरंग्याचा अभिमान बाळगा, आपल्या राष्ट्रगीताचा सन्मान करा, संविधानाचा आदर करा. भारताचे जागरूक नागरिक होण्याचा हाही एक मार्ग आहे. तुम्ही निवडलेल्या सरकारवर विश्वास ठेवा. कारण आपल्या




*मा. नाईकसाहेब – आपले प्रेरणादायी विचार मांडताना*



*श्रोतृवर्ग*

इथे सरकारविरोधी गरळ ओकणारी पीतपत्रकारिता आणि काही परदेशी मिडिया हाऊसेस आपल्या सरकारच्या विरोधी जनमत तयार करण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहेत. त्यात आपणच निवडून दिलेल्या सरकारवर आपण अविश्वास दाखवू लागतो, हे चुकीचे आहे. आपण निवडलेल्या सरकारवर आपला पूर्ण विश्वास असणे आवश्यक आहे. तसेच अन्यायाच्या विरुद्ध आवाज उठवायला विसरू नका. एवढ्या काही गोष्टी तुम्ही केल्या, तर या जवानांनी तुमच्यासाठी केलेल्या बलिदानासाठी तुम्ही पात्र ठराल.

आता वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी काही गोष्टी सांगतो. तुम्ही आता शाळेतून, या विद्यार्थीदशेतून बाहेर पडाल. कॉलेजमध्ये जाल, जॉब कराल, तुमचा स्वतःचा व्यवसाय कराल. तेव्हा तुम्हाला हा देश, हा समाज जास्त जबाबदार धरेल. आता कसं होतंय, तुम्हाला शिक्षकांवर, पालकांवर तुमच्या अपयशाचे खापर फोडता येते. त्यामुळे भविष्यासाठी तुम्ही आत्ताच स्वतःला तयार करा; जेणेकरून तुम्ही स्वतःच्या पायावर उभे राहाल तेव्हा तुम्हाला अपयशाचा सामना करावा लागणार नाही. आणि त्यातूनही तुम्हाला अपयश आलंच, तर एक गोष्ट लक्षात ठेवा की, आयुष्य म्हणजे अपयशाला घाबरून मृत्यू कवटाळणे नव्हे. छोट्याछोट्या अपयशांनी कोलमडून जाण्यापेक्षा येणाऱ्या संकटांचा अभ्यास करून स्वतःला भविष्यासाठी तयार करा. आता कसं, तुम्ही छान अभ्यास करता. तुम्हाला छान मार्क मिळतात. शिक्षक आणि पालक सगळे तुमचे कौतुक करतात. पण प्रत्यक्ष आयुष्यात असं घडत नाही. तुम्ही कितीही सुंदर काम करा, पण कौतुक दुसऱ्याचे होते. तुम्ही कष्ट करता, पण प्रमोशन भलत्यालाच मिळते. कारण, त्याचे वरिष्ठांशी चांगले संबंध असतात. अशा वेगवेगळ्या अनुभवांना सामोरे जाण्यासाठी स्वतःला तयार करा आणि एकदा का तुम्ही स्वतःला तयार केलं की मग, आयुष्य साधं सरळ नाही, हे तुमच्या लक्षात येईल. यश आणि अपयश यांच्यामध्ये एक व्यस्त प्रमाण आहे. या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यश कुणाला आवडत नाही? प्रत्येकाला यशस्वी होणे आवडते, जिंकणे आवडते. तुम्ही यशस्वी होता, जिंकता आणि तुम्ही प्रसिद्ध होता. पण हे यश फार अस्थिर आहे. भारतीय क्रिकेट टीमचे उदाहरण बघा. आपली टीम एखादी मॅच जिंकते तर पुढच्या चार-पाच मॅचेस हरते. नुसतं यशस्वी होण्यापेक्षा, तुमच्या यशामध्ये माणुसकी असली पाहिजे. माझ्या दृष्टीने ते जास्त महत्त्वाचं आहे. आणि म्हणूनच यशापेक्षा अपयश हे माणसाला जास्त माणुसकी शिकवते. अपयशामुळे आपण आपल्या क्षमतांचा विचार करायला लागतो. आयुष्यामध्ये आपल्याला अजून काय करायचं आहे, याचा विचार करायला अपयश भाग पाडते. त्यामुळे आपल्याला आपल्या क्षमता वाढवता येतात. म्हणून अपयशाला घाबरून जाऊ नका. अपयशाला घाबरणे म्हणजे तुमच्या व्यक्तिमत्त्वामध्ये 'झिरो एरर सिंड्रोम' आहे. 'झिरो एरर सिंड्रोम' म्हणजेच अपयशाला सामोरे जाण्याची शून्य क्षमता. आणि असा माणूस हा कुठल्याही संस्थेला किंवा त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या व्यक्तींसाठी अडचण, अडथळा किंवा धोकादायक ठरू शकतो. वाटल्यास गुगलवर तुम्ही याविषयी अधिक माहिती सर्च करू शकता.

यानंतर आपल्या भोवतालच्या बाहेरचे जग. आपल्या शाळेच्या बाहेर एक मोठं वास्तववादी जग आहे. त्यामध्ये तुमच्यातील कला आणि व्यावसायिक ज्ञानाला कुठलाही पर्याय उपलब्ध नाही. प्रत्येकाला स्वतःला सिद्ध करावेच लागते. त्यासाठी कोणत्याही प्रकारचा शॉर्टकट वापरून चालत नाही. म्हणतात ना की, खिशात हात घालून यशाची शिडी चढता येत नाही. तुम्हाला स्वतःला कष्ट घ्यावे लागतात. एक बोधकथा सांगते की, एका शेतात अनेक पक्षी प्राणी होते. झाडावर उंच ठिकाणी एक गरुड निवांत बसलेला असायचा. त्याला कधी कुणी काम करताना बघितलं नव्हतं. एके दिवशी एका सशाने त्याला विचारलं की, तू हे कसं काय करतोस? आणि मला तुझ्यासारखे जगता येईल का? गरुड

म्हणाला, 'हे एकदम सोपे आहे. मी काहीच करत नाही. मी निवांत असतो.' हे ऐकून सशाने एक उशी घेतली, एक पुस्तक घेतलं आणि झाडाखाली झोपून निवांत पुस्तक वाचू लागला. तिकडून एक लांडगा आला आणि त्याने बघितलं की, ससा निवांत झोपून आहे. लांडग्याला काय, आयतीच शिकार मिळाली! तात्पर्य असे की, तुम्ही स्वतः पुरेसे वरिष्ठ झाल्याशिवाय तुम्हाला कष्ट करण्यावाचून दुसरा कुठलाही पर्याय नाही. आता तुमच्या आयुष्यात जर तुम्हाला वरिष्ठ पदापर्यंत जायचं असेल, तर अनेक कौशल्ये आणि गुणवत्ता तुम्हाला आत्मसात करावी लागतील. ही वेगवेगळी कौशल्ये आणि अनेक प्रकारच्या गुणवत्ता आहेत. थोडक्यात, वेळेअभावी मी तुम्हाला काहींचीच जाणीव करून देतो. हिंमत, धैर्य ही सर्वप्रथम गुणवत्ता. हिंमत दोन प्रकारची आहे. शारीरिक हिंमत आणि मनोधैर्य. आपल्याला जोपर्यंत तशी परिस्थिती येत नाही तोपर्यंत आपल्यामध्ये शारीरिक हिंमत आहे की नाही हे कळत नाही. म्हणजे अनेक वीररत्न, अशोकचक्र, परमवीरचक्र पुरस्कार विजेते भारतीय जवान त्यांच्यातील धैर्याने, शारीरिकदृष्ट्या आपल्या सर्वोच्च बलिदानाने आपल्याला अचंबित करतात. एखादा जंगली कुत्रा तुमच्या मागे लागला, तर तुम्ही त्याला घाबरून पळाल की त्याला माराल, यावरून तुमचे शारीरिक धैर्य समजते. रस्त्यावर मुलीची छेड काढणाऱ्या गुंडांच्या तावडीतून तुम्ही त्या मुलीला वाचवाल का व्हिडिओ रील करणारे 'बघे' व्हाल? यावरून तुमच्यातले शारीरिक धैर्य कळते. म्हणजेच परिस्थिती आल्यावर तुमच्यातली शारीरिक हिंमत आपोआप जागृत होते. दुसरं आहे मानसिक धैर्य. अत्यंत विपरीत परिस्थितीमध्ये सुद्धा तुम्ही चुकीला चूक म्हणण्याची हिंमत दाखवणे आणि ती सुधारण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे याला मानसिक धैर्य असे म्हणतात. शनिवारवाड्यातील श्रीमंत माधवराव पेशव्यांच्या पगडीचा मोत्याचा तुरा न घाबरता सरळ करण्याचे सुचविणाऱ्या पखालजीची गोष्ट आपल्या सगळ्यांना माहीत आहेच.

या धैर्यानंतर येतो प्रामाणिकपणा. प्रामाणिकपणा म्हणजे केवळ पैशाच्या बाबतीतला प्रामाणिकपणा नव्हे, तर जेव्हा तुम्ही स्वतःला आरशात बघता आणि विचारता की, तुम्ही कोण आहात? म्हणजे खरे आहात? की खोटे आहात? तुम्हाला तुमचे गुणदोष नक्की माहीत आहेत का नाहीत? हे जाणणं म्हणजे प्रामाणिकपणा. तुमचे खूप सारे मित्र असतात पण ते सगळेच तुमच्याशी प्रामाणिक असतात का? तुम्ही सगळ्यांशी प्रामाणिक सल्ला देऊन खरे वागू शकता का? तुमचा सल्ला हा प्रामाणिक असावा. मग तो समोरच्याला चांगला वाटो किंवा वाईट वाटो. तुम्ही न डगमगता, तुमचं खरं मत मांडू शकाल असा प्रामाणिकपणा तुम्ही तुमच्या अंगी जोपासला पाहिजे.

त्यानंतर येते एकात्मता, अखंडता. ही अखंडता म्हणजे तुमच्या ध्येयाप्रती असलेल्या खात्रीचा धैर्यपूर्वक विश्वास. सगळ्या जगाने जरी तुमच्यावर अविश्वास दाखवला तरीसुद्धा, एक माणूस म्हणून तुमच्या अंगी स्वतःविषयी अढळ विश्वास बाळगणे अत्यंत आवश्यक आहे. स्वतःवर आणि देशाप्रती असलेल्या स्वतःच्या निष्ठेवर अखंड विश्वास असलेल्या मेजर जनरल नथू सिंग राठोड यांनी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांना थेट उत्तर देण्याची हिंमत दाखवली होती.

आता शेवटचा मुद्दा आहे निष्ठा. तुमची स्वतःप्रति, स्वतःच्या कुटुंबाप्रति, तुमच्या संपर्कातील लोकांप्रति, मित्रांप्रति, तुमच्या शाळेप्रति, तुमच्या समाजाप्रति, गावाप्रति, राज्याप्रति आणि देशाप्रति तुमची निष्ठा आहे का नाही? हे प्रत्येकाने तपासून घेतले पाहिजे. 'निष्ठा' हा एक अत्यंत महत्त्वाचा सद्गुण आहे आणि तो आपण प्रत्येकानेच अंगी बाळगणे देशासाठी आणि राष्ट्रहितासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. तुमच्यासारख्या तरुणांना, विद्यार्थ्यांना हे माहीत असले पाहिजे की येणाऱ्या काळामध्ये भारताचे नेतृत्व करणारी तुमची पिढी ही निष्ठावंत व्हायला हवी. येथे बसलेल्या वडीलधाऱ्यांनी त्यांचं काम केलेलं आहे. आता पुढच्या पिढीने देशासाठी आपल्या निष्ठा समर्पित करण्याची वेळ लवकरच येणार आहे. तुम्ही एका उज्वल सोनेरी भारताच्या कालखंडामध्ये प्रवेश करत आहात. राजकारणामध्ये, शिक्षणामध्ये, वैद्यकीय सेवांमध्ये, सैन्य दलामध्ये असे अनेक उज्ज्वल नेतृत्वाचे नेते तयार होतील. आणि म्हणून माझ्या मित्रांनो तुम्ही या एवढ्या चांगल्या संस्थेच्या प्रांगणामध्ये शिक्षण घेत आहात, तुम्ही खूप सुदैवी आहात. धैर्य, प्रामाणिकपणा, एकात्मता आणि निष्ठा हे सद्गुण अंगी बाणवलेत तर तुम्ही देशाच्या विकासासाठी तुमचे योगदान नक्की देऊ शकाल आणि त्यासाठी आज या संस्थेने तुमच्यासाठी ज्ञानाची, विज्ञानाची तंत्रज्ञानाची दालने खुली केली आहेत. धन्यवाद.

श्रीमती प्राजक्ता चाळके यांनी सर्वांचे आभार मानल्यावर हा कार्यक्रम समाप्त झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती प्राची गोखले आणि श्रीमती महाडीक यांनी केले.

# श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत ७४ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा !



श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्लिश मिडियम स्कूलच्या वतीने संस्थेच्या डेरवण येथील क्रीडासंकुलात भारताचा ७४ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भारताच्या वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन महामंडळाचे सेवानिवृत्त वैज्ञानिक माननीय डॉ. सुरेंद्र घासकडबी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे विश्वस्त माननीय श्री. विकासराव वालावलकर, वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील आणि इतर उपस्थित मान्यवरांसह त्यांचे समारंभस्थानी आगमन होताच सर्वांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. शाळेतील शिक्षिका श्रीमती सकपाळ यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून, त्यांचा थोडक्यात परिचय करून दिला.

सकाळी ठीक आठ वाजता प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते भारताचा तिरंगा ध्वज मोठ्या दिमाखात फडकवण्यात आला. राष्ट्रगीताने तसेच ध्वजगीताने झेंड्याला मानवंदना देत प्रजासत्ताक दिनाच्या



*डॉक्टर सुरेंद्र घासकडबी कु. यशश्री राजेचा गौरव करताना*



*डॉक्टर सुरेंद्र घासकडबी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना*

सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला.

एस.व्ही.जे.सी.टी.च्या इंग्लिश मिडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांना विविध भारतीय भाषांप्रमाणेच जर्मन आणि स्पॅनिश या परदेशी भाषाही शाळेमध्ये शिकवल्या जातात. विविध वयोगटातील आणि विविध वर्गातील विद्यार्थ्यांनी इंग्रजी, संस्कृत, जर्मन आणि स्पॅनिश अशा विविध भाषांमधून भाषणे करत आपले विचार व्यक्त केले.

भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून नेमबाजी या क्रीडा प्रकारातील बारावीतील CBSE विभागीय स्पर्धेतील सुवर्णपदक आणि राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेमध्ये निवड झाल्याबद्दल कु. साक्षी सूरज डांगे या विद्यार्थिनीचा तसेच CBSE विभागीय स्पर्धेतील कांस्यपदक विजेती कु. यशश्री ओमप्रकाश राजे हिचा राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत निवड झाल्याबद्दल शाळेतर्फे प्रत्येकी दोन हजार रुपयांचे पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. मल्लखांब या क्रीडा प्रकारातील राज्यस्तरीय आंतरशालेय क्रीडा स्पर्धेमध्ये यश मिळवलेल्या इयत्ता दहावीतील कुमार साई तानाजी धनावडे याला एक हजार रुपयांचे पारितोषिक देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉक्टर सुरेंद्र घासकडबी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना, विज्ञानाचे आपल्या दैनंदिन आयुष्यातील महत्त्व आणि राष्ट्रीय विकासातील आपले योगदान याविषयी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, भारतीय नागरिक म्हणून आपण प्रत्येकाने नवनवीन संकल्पना, नवनवीन शोध आणि नवीन विचारांनी समृद्ध करणारा वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारला पाहिजे. आपण आपल्या बाजूला घडत असलेल्या घटनांचे सूक्ष्म निरीक्षण करणे आणि त्यातून स्वतःचे ज्ञान समृद्ध करणे विद्यार्थी दशेतील एक अत्यंत आवश्यक कार्य आहे. आपल्या घरातील छोट्याछोट्या उपकरणांपासून ते इथे नुकतेच उद्घाटन झालेल्या जॅग्वार विमानाच्या तंत्रज्ञानापर्यंत प्रत्येक गोष्टीमध्ये विज्ञान लपलेले आहे. आपण विज्ञानाशी संबंधित असलेल्या इतर अनेक शाखांचा परस्पर संबंध लक्षात घेऊन आपल्या देशाच्या प्रगतीसाठी आपले योगदान देणे आवश्यक आहे. या संस्थेच्या प्रांगणात तुम्हाला ज्ञान – विज्ञान – तंत्रज्ञान, जीवनमूल्ये आणि संस्कार हे सारे एकत्र मिळत आहे, याचा तुम्हाला अभिमान असला पाहिजे. तुम्ही सर्व नशीबवान आहात की तुम्हाला गणितापासून ते खगोलशास्त्रापर्यंत आणि वैद्यकीय शिक्षणापासून ते विविध क्रीडा कौशल्यांपर्यंत चौफेर शिक्षण या एकाच छताखाली मिळत आहे. धावण्याच्या शर्यतीतील सुवर्णपदक आणि रौप्यपदकामध्ये सेकंदाच्या हजाराव्या भागाचा फरक कारणीभूत ठरतो. हे विज्ञान आहे. आणि आपल्या दैनंदिन जीवनामध्ये आपण वैज्ञानिकांप्रमाणेच प्रत्येकाच्या योगदानाचा आदर करणे, न्यायासाठी उभे ठाकणे आणि आपल्या कष्टांची उपयोगिता इतरांच्या दृष्टीने तपासणे अशी काही मूल्ये अंगीकारली पाहिजेत. या तीन जीवनमूल्यांच्या आधारे तुम्हाला तुमचं स्वतःचं आणि समाजातील तुमच्या आजूबाजूच्या हजारो, लाखो व्यक्तींचं आयुष्य समृद्ध करता येईल. या संस्थेतून देशाच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी हातभार लावणारे भावी वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, वैद्यकीय चिकित्सक आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञ निश्चित निर्माण होतील, असा मला विश्वास वाटतो. तुम्ही भविष्यामध्ये कोणतेही क्षेत्र निवडा. पण, त्यामध्ये आवडीने आणि अत्यंत प्रामाणिकपणे काम करा. तुमच्या शाळेने, संस्थेने रुजवलेली मूल्ये आयुष्यात तुम्हाला यशस्वी होण्यासाठी नक्की मदत करतील.

यानंतर सर्व मान्यवरांसमोर विद्यार्थ्यांनी खास प्रजासत्ताक दिनानिमित्त तयार केलेला विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सर्वांसाठी सादर केला. इयत्ता पहिलीच्या चिमुरड्यांनी फ्लॉवर डान्स सादर करून प्रसन्न वातावरण निर्मिती केली. तर इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी 'ये देश है वीर जवानों का' या देशभक्तीपर गाण्यावर भांगडा नृत्य सादर करून उपस्थित पालकवर्गाला या गाण्यावर ताल धरायला भाग पाडले.

आपल्या देशाच्या सीमांवर तैनात असणाऱ्या कर्तव्यदक्ष सैनिकांचे सर्वोच्च बलिदान आपल्याला सतत देशभक्तीच्या उज्ज्वल

इतिहासाची आठवण करून देत असते. हीच समर्पण वृत्ती अधोरेखित करणाऱ्या देशभक्तीपर नृत्याविष्कारातून इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी उपस्थितांसह सर्वांनाच गहिवरून टाकले.

शारीरिक क्षमते बरोबरच मानसिक क्षमता सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी म्हणून शाळेमध्ये विद्यार्थ्यांना योगासनांचे शिक्षण दिले जाते. आपल्या भारतीय संस्कृतीतील अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या याच योगासनांवर आधारित नृत्य, शाळेतील कसलेल्या बाल योगनर्तिकांनी सादर करून आपल्या शारीरिक लवचिकतेने, चपळाईने आणि लयबद्ध हालचालींनी सर्वांना थक्क केले! विजेच्या वेगाने आणि चित्त्याच्या चपळाईने कसरती करत, शरीराचा पुरेपूर उपयोग करून कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त व्यायाम देणारा नेत्रदीपक आणि चित्तवेधक क्रीडाप्रकार म्हणजे मल्लखांब. याच मल्लखांबावर शाळेतील मल्लखांबपटूंनी त्यांचे चापल्य दाखवत, विविध विलोभनीय प्रात्यक्षिके करून प्रमुख पाहुण्यांसह सर्व उपस्थितांची मने जिंकली.

इयत्ता तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थिनींनी सादर केलेला रिंग डान्स कौतुकास्पद ठरला. तर इयत्ता सहावी, सातवी आणि आठवीतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या लाल मातीतील संस्कृती लेजीमच्या साहाय्याने अत्यंत लयबद्ध आणि तालबद्ध कवायती सादर करून प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र संस्कृतीची बहार आणली.

अशा या रंगलेल्या दिमाखदार प्रजासत्ताक सोहळ्याची सांगता शाळेतील शिक्षक श्री. गर्दे यांच्या आभार प्रदर्शनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववीतील विद्यार्थिनी कु. गौरी पाटील आणि कु. सृष्टी तेटांबे यांनी केले. या कार्यक्रमाला एसव्हीजेसीटी संस्थेच्या विविध विभागातील सर्व संचालक, पदाधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. अनेक पालकांनीही याप्रसंगी आपली उपस्थिती नोंदवली. या वेळी शाळेकडून उपस्थितांना चहापान तर विद्यार्थ्यांसाठी खाऊ देण्यात आला.









# डेरवण इंग्रजी शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे




डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये 'वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ' नुकताच उत्साहात संपन्न झाला. या वेळी डॉ. माधव राजवाडे, प्राचार्य, साठ्ये कॉलेज, विलेपार्ले, मुंबई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी ईशस्तवन सादर केले. या समयी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ.जान्हवी चाळके यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. शाळेच्या संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांनी पाहुण्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व शाळेच्या वर्षभरातील प्रगतीचा आढावा घेतला.

डॉ. माधव राजवाडे यांच्या हस्ते शालेय सहशालेय व क्रीडा स्पर्धांमध्ये नैपुण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे म्हणाले की ''लहान मुलांच्या चेहऱ्यावरील निरागस भाव पाहून आनंद झाला. बक्षीस मिळालेले असूनही त्याचा गर्व मुलांच्या चेहऱ्यावर दिसला नाही. हीच साधेपणाची भावना आपण सर्व मोठ्यांनी ह्या मुलांकडून शिकली पाहिजे. या संस्थेच्या कार्याला एवढी मोठी व्याप्ती आणणारे प्रेरणास्रोत आदरणीय श्रीकाकामहाराज स्वत: व्यासपीठावर न बसता प्रेक्षकांत बसले आहेत यातच त्यांची आत्मलोप वृत्ती दिसून येते. अशा शैक्षणिक संकुलातील संस्कारच



*डॉ. माधव राजवाडे आपले विचार व्यक्त करताना*



*डॉ. माधव राजवाडे छोट्या विद्यार्थ्याला पारितोषिक देताना*

एवढे चांगले असतात की येथून विद्यार्थी घडतील तेव्हा त्यांच्या ठिकाणी इतरांपेक्षा काहीतरी विशेष असणारच!

येथील विद्यार्थ्यांमध्ये निरागसतेबरोबरच चौकस वृत्ती, आत्मविश्वास, सर्जनशीलताही दिसून येते. विद्यार्थ्यांनी या शाळेत त्यांची जडणघडण होत असताना जे सद्‌गुण अंगी बाणवले आहेत ते समृद्ध करण्याची दक्षता पालकांनी घेतली पाहिजे. विद्यार्थ्यांचा कल असेल त्याप्रमाणे त्यांना भविष्य घडविण्याची संधी पालकांनी दिली पाहिजे. या डेरवणच्या शैक्षणिक संकुलातून ज्या मुलांचा पाया घातला गेला आहे, ती मुले आपल्या भारताचे सुजाण नागरिक बनतील यात शंका नाही.

आपला भारत देश स्वातंत्र्याचा अमृतकाळ साजरा करत आहे आणि ही संस्था जीवनाची प्रयोगशाळा आहे जिथे निरागस बालकाला भारताचा कर्तृत्ववान जबाबदार नागरिक बनविण्यासाठी आवश्यक शिक्षण, आरोग्य शरीरसौष्ठव, सामाजिक कर्तव्य इ. सर्व घटक या संस्थेत आहेत.''

यानंतर विद्यार्थ्यांनी भारतातील विविध परंपरा संस्कृती आणि लोककला यांचे दर्शन घडविणारा नृत्याविष्कार सादर केला. विघ्नहर्ता गणरायाच्या 'गजानना श्रीगणराया' या गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. नर्सरी, ज्युनियर के.जी. आणि सीनियर के.जी.च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'चांदोमामा' 'अग्गोबाई ढग्गोबाई' 'चिऊताई' यांसारख्या बालगीतांनी प्रेक्षकांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. बालवयातच पर्यावरणाविषयी सजगता यावी यासाठी स्वच्छतेविषयी संदेश देणारे 'हम होंगे कामयाब' हे गीत इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी सादर करून प्रेक्षकांची विशेष दाद मिळवली. 'अच्युतं केशवम्' या संस्कृत स्तोत्राच्या सादरीकरणाने तर प्रेक्षकांना भुरळ घातली. इयत्ता पाचवीच्या दिंडीने प्रेक्षकांना ठेकाच धरायला लावला. इयत्ता सहावीचे 'हर हर शंभो' व सातवीचे 'येळकोट भंडारा' ही नृत्ये प्रेक्षकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. इयत्ता नववीच्या 'तेरी मिट्टी मे' या देशभक्तीपर गीताने प्रेक्षकांची मने जिंकली. यासोबतच विद्यार्थ्यांनी इंग्रजी गाण्यांवर आधारित नृत्ये, संगीत वाद्यांवर आधारित नृत्य तसेच लयबद्ध योगासने सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. अशोकराव जोशी, संस्थेतील इतर मान्यवर व पालक मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते. शाळा संचालिका सौ. शरयू यशवंतराव यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका श्रीम. प्रज्ञा पारकर, सौ. जान्हवी चाळके, सौ. पल्लवी तेंडुलकर श्री. कल्पेश जुवेकर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले.











# डेरवण क्रीडासंकुलात राज्यस्तरीय कॅरम स्पर्धा संपन्न




*कॅरम स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. किरण बोरावडेकर प्रास्ताविक भाषण करताना*
*बसलेले - उजवीकडून -सचिन निलख, संदीप तावडे, धनश्री करंजकर, श्रीकांत पराडकर, नितिन लिमये आणि मिलिंद साप्ते*

जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांच्यावतीने व महाराष्ट्र राज्य कॅरम असोसिशन व श्री विठ्ठलराव जोशी चरिटीज ट्रस्ट डेरवण यांच्या सहकार्याने दि. १४ जानेवारी ते १६ जानेवारी २०२३ या कालावधीत डेरवण क्रीडासंकुलात १४ व १७ वर्षांखालील मुले व मुलींच्या शालेय राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये ८ विभागातून एकूण २१० खेळाडू सहभागी झाले होते.

स्पर्धेच्या उद्‌घाटन समारंभास प्रथम वैयक्तिक ऑलिम्पिक विजेते, कुस्तीपटू कै. खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमासाठी श्री. सचिन निलख (साहाय्यक वन संरक्षक अधिकारी), श्री. संदीप तावडे (महाराष्ट्र राज्य खो खो असोसिएशन पदाधिकारी), धनश्री करंजकर (साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सावर्डे), रत्नागिरी जिल्हा शारीरिक शिक्षण संघटनेचे अध्यक्ष श्री. उदयराज कळंबे, स्पर्धा तांत्रिक समिती सदस्य श्री. मिलिंद साप्ते, मा. श्री. नितिन लिमये (रत्नागिरी जिल्हा कॅरम असोसिएशनचे खजिनदार), श्री. किरण बोरवडेकर (जिल्हा क्रीडा अधिकारी) आणि क्रीडा संचालक मा. श्रीकांत पराडकर आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी सावर्डे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी कोकणातील पारंपरिक जाखडी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

१४ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये कोल्हापूरचा अमूल्य अरुण घाडी हा विजेता तर प्रणव प्रमोद गायकवाड (पुणे) हा उपविजेता ठरला. तसेच ओम दिनेश पारकर (कोल्हापूर) याने कांस्यपदकाची कमाई केली. १४ वर्षांखालील मुलींच्या गटामध्ये मुंबईची सिमरन सचिन शिंदे ही विजेती तर आर्या अमित घाणेकर (मुंबई) ही उपविजेती ठरली. पूर्वा दीपक केतकर (कोल्हापूर) हिने तृतीय क्रमांक मिळविला.

१७ वर्षे वयोगटातील मुलांमध्ये मुंबईचा निलंश हितेन चिपळूणकर हा विजेता तर अली मो यासीन (नागपूर) हा उपविजेता ठरला. अथर्व दत्ता पाटील (पुणे) याने कांस्यपदकाची कमाई केली. तसेच १७ वर्षांखालील मुलींच्या गटामध्ये दीक्षा नंदकिशोर चव्हाण (कोल्हापूर) ही विजेती तर प्रणिता नथुराम आयरे (कोल्हापूर) ही उपविजेती ठरली व मयूरी सुभाष गावडे (कोल्हापूर) हिने तृतीय क्रमांक मिळविला.

मुंबई, कोल्हापूर, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, लातूर यासारख्या विविध जिल्ह्यांतून आलेल्या खेळाडूंनी दर्जेदार खेळाचे प्रदर्शन केले.

स्पर्धेसाठी अनेक नामवंत प्रशिक्षक आपल्या संघांसह उपस्थित होते. त्या सर्वांनीच क्रीडासंकुलातील सर्वच सुविधा उत्तम असल्यामुळे स्पर्धा विनाअडथळा संपन्न झाली यासाठी आनंद व्यक्त केला. स्पर्धेनिमित्त आम्ही पालक अनेक ठिकाणी जाऊन स्पर्धा खेळतो, परंतु असे क्रीडासंकुल आमच्या पाल्यांच्या खेळातील कौशल्यासाठी प्रेरणादायी आहे, त्यामुळे संस्थेचे विशेष आभार, अशा भावना पालकांनी व्यक्त केल्या.






*कॅरम स्पर्धा - क्षणचित्रे*

# राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत मुंबई व क्रीडा प्रबोधिनी संघांचे वर्चस्व





जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा एसव्हीजेसीटी क्रीडासंकुल, डेरवण येथे १४, १७ व १९ वर्षांखालील फक्त मुलींसाठी आयोजित करण्यात आली होती. दिनांक १० ते १२ जानेवारी २०२३ या कालावधीत पार पडलेल्या या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर, पुणे, मुंबई, नाशिक, लातूर, औरंगाबाद, अमरावती, नागपूर आणि क्रीडा प्रबोधिनी असे नऊ विभागातून मुलींचे संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेमध्ये ९ विभागातून एकूण २१० खेळाडू, पालक, प्रशिक्षक अशा ४००हून अधिक क्रीडाप्रेमींनी या कालावधीत संकुलाचा लाभ घेतला.

अंतिम लढतीत १४ वर्षांखालील गटात मुंबई व क्रीडा प्रबोधिनी, पुणे यांच्यातील रंगलेल्या सामन्यांमध्ये मुंबई संघाने विजेतेपद पटकावले. १७ वर्षांखालील गटात क्रीडा प्रबोधिनी, पुणे विरुद्ध मुंबई विभाग यांच्यातील सामन्यांमध्ये मुंबई संघानेच विजय मिळवला, तर १९ वर्षांखालील गटात क्रीडा प्रबोधिनी विरुद्ध औरंगाबाद अशा चुरशीचा झालेल्या सामन्यांमध्ये औरंगाबाद उपविजेते ठरून क्रीडा प्रबोधिनी, पुणे संघ विजयी ठरला. विजेत्या खेळाडूंना पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाला जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, क्रीडा मार्गदर्शक सचिन मांडवकर, विशाल बोडके, महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशनचे अजित गाळवणकर, संजय कडू, मधुकर लोणारी आदी मान्यवर उपस्थित होते.


BASKETBALL
METCO
UTT
Enigma
KTR METCO
9
11


TABLE TENNIS
KTR METCO
Enigma
FOLD-N-ROLL
KTR METCO
4

# डेरवण एनर्जीया फुटबॉल स्पर्धेत रीवा एफसी 'अ' संघ अंतिम विजेतेपदाचा मानकरी

एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात दि. १८ जानेवारी ते २१ जानेवारी २०२३ या कालावधीत डेरवण एनर्जीया फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १७ वर्षांखालील फक्त मुलींसाठी आयोजित केलेल्या या स्पर्धेत एकूण ११ संघांनी सहभाग नोंदविला होता.

स्पर्धेसाठी हरियाना, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश या राज्यांमधून तसेच मुंबई, कोल्हापूर, पुणे येथून संघ सहभागी झाले होते.

लीग आणि नॉक आऊट पद्धतीने खेळविण्यात आलेल्या या स्पर्धेत रीवा एफसीच्या दोन्ही संघांनी वर्चस्व नोंदवले. उपांत्य फेरीतील झालेल्या पहिल्या सामन्यात रीवा एफसी ब संघाने नर्मदा व्हॅले (मध्यप्रदेश) या संघाचा १-० असा पराभव केला. उपांत्य फेरीतील दुसऱ्या सामन्यात रीवा एफसी अ या संघाने अनंतपुरम या संघावर १-० अशा फरकाने गोल करून अंतिम फेरीत आपले नाव कोरले. अंतिम लढतीत 'रीवा एफसी अ' विरुद्ध 'रीवा एफसी ब' या संघांमध्ये झालेल्या बरोबरीतील चुरशीच्या खेळामध्ये पेनल्टी शूटआऊट वर खेळविण्यात आलेल्या सामन्यात रीवा एफसी अ हा संघ ३-० या फरकाने अजिंक्यपदाचा मानकरी ठरला. विजेत्या संघांला रु. १,००,०००/- आणि उपविजेत्या संघाला रु. ७५,०००/- आणि आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच माया रबारी - उत्कृष्ठ गोलरक्षक आणि राष्ट्रीय संघातील खेळाडू सौमय्या शेख - गोल्डन बूट चषकाच्या मानकरी ठरल्या. स्पर्धेचे उद्घाटन वालावलकर रुग्णालयाचे डॉ. आनंद जोशी (पोटाच्या विकारांचे तज्ज्ञ) यांच्या हस्ते करण्यात आले.

तर स्पर्धेचे परितोषिक वितरण डॉ. रिटा मुल्हेरकर (मेडिकल रिसर्च साइंटिस्ट, वालावलकर हॉस्पिटल) यांच्या हस्ते करण्यात आले.




*रीवा अ संघ पारितोषिक स्वीकारताना*

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com





*फुटबॉल स्पर्धा - क्षणचित्रे*

**छत्रपती श्री शिवाजीमहाराज जयंती निमित्त**
**शुक्रवार, दि. ३ मार्च २०२३**
**ते**
**शुक्रवार, दि. १० मार्च २०२३ पर्यंत**

**SVJCT क्रीडासंकुलात**

# भव्य क्रीडा स्पर्धा

**छत्रपती श्रीशिवाजीमहाराज यांचा जयंती सोहळा**
**फाल्गुन वद्य तृतिया, शालिवाहन शक १९४४**
**शिवराज्याभिषेक शक ३४९**
**शुक्रवार, दि. १० मार्च २०२३**

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६३९ येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०